नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १३/०९/२०२५ ( शनिवार )**

---

## दिनांक १२/०९/२०२५ रोजी रामटेक कृषी मेळाव्याच्या निमित्ताने थोर आदिवासी क्रांतिकारक वीर बाबूराव शेडमाके यांच्या जंगोम सेनेचा इतिहास सादर करणारे ''जंगोम'' नाटकाचे सादरीकरणाला जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभल्याबाबत..

**रामटेक :—** रामटेक कृषी मेळाव्याच्या निमित्ताने नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या वतीने पोलीस अधिक्षक मा. हर्ष ए पोद्दार यांच्या पुढाकाराने सन १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दात गोंडवनात क्रांतीची मशाल पेटवणारे थोर आदिवासी क्रांतिकारक वीर बाबूराव शेडमाके यांच्या जंगोम सेनेचा इतिहास सादर करणारे आणि वर्तमानातील परकीय शक्तींच्या वेढ्यात अडकलेल्या गोंडवनाचा आढावा घेणारी मराठी नाटक जी डॉ. दंदे फाऊंडेशन निर्मित, हेमेंदू रंगभूमी, नागपूर प्रस्तूत, लेखक प्रवीण खापरे लिखीत व दिग्दर्शक शुभम निकम यांच्या व्दारे दिग्दर्शित जंगोम या दोन अंकी नाटकाचा विशेष प्रयोग शुक्रवार दिनांक १२/०९/२०२५ रोजी संध्याकाळी ०६:३० वाजता, नेहरू ग्राऊंड, रामटेक या ठिकाणी पार पडला. सदर कार्यक्रमास मा. ना. ॲड अशिष जयस्वाल, राज्य मंत्री ( वित,नियोजन,कृषी,मदत व पुनर्वसन, विधी व न्याय, कामगार) महराष्ट्र राज्य, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण, श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग, श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक, पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, रामटेक पोलीस स्टेशन यांच्या इतर पोलीस अधिकारी आणि अंमलदार यांच्यासह मोठया प्रमाणात प्रेक्षकवर्ग हजर होता. कलाकारांनी साकारलेल्या अभुतपुर्व **''जंगोम''** नाटकाला जनतेचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.




## पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी अप. क्र. ३२५/२०२५ कलम १०८,३५१(२) भा.न्या.सं बाबत

पोलीस स्टेशन एमआयडीसी बुटीबोरी हददीत मौजा सालई दाभा येथे राहणारी कबड्डी खेडाळू नामे कु. छकुली सुरेश पिटेकर, वय १९ वर्षे, हीने दिनांक ३१/०७/२०२५ चे सकाळी ११/०० वा.दरम्यान घरी कोणीही हजर नसतांना घराचे खोलीत कडधान्य मध्ये टाकावयाचे किटकनाशक विषारी औषध प्राशन करून मरण पावल्याने पोलीस स्टेशन, एमआयडीसी बोरी येथे दि. ०१/०८/२०२५ रोजी मर्ग क्र. २४/२०२५ कलम १९४ भारतीय नागरीक सुरक्षा संहीता अन्वये मर्गची नोंद करण्यात आली असून पोलीस अधिकारी व स्टॉप घटनास्थळी भेट देवून घटनास्थळाचे सविस्तर घटनास्थळ पंचनामा कार्यवाही करून घटनास्थळावरून विषारी औषध चे फॉरेन्सीक पथक नागपूर चे माध्यमाने जप्त करून सिए तपासणी करीता सिए कार्यालय नागपूर येथे पाठविण्यात आले. मर्गचे चौकशी दरम्यान दिनांक १/०८/२०२५ रोजी मृतकचे बहीणने पोलीस स्टेशन, एमआयडीसी बोरी येथे सदर आत्महत्येस तिचा कबड्डी कोच जबाबदार असल्याबाबत दिलेल्या तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशनला अप. क्र. ३२५/२०२५ कलम

१०८,३५१(२) भा.न्या.सं प्रमाणे गुन्हा नोंद करून आरोपीचा शोध कामी तपास पथकत यार करून आरोपीचा शोध घेवून आरोपीस तुर्तास अटक करून त्यांचा पोलीस कस्टडी रिमाड घेवून पुढील तपास करण्यात आला असून सद्या आरोपी हा मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे दाखल आहे.

सदर प्रकरणाचे तपासदरम्यान मृतकाचे बहीण (फिर्यादी) ने आरोपीसोबत कबड्डीतील पदाधिकारी हे सुध्दा जबाबदार असल्याबाबत सांगितल्याने सदर गुन्हयाचा तपासात मृतकाचे नातेवाईक व इतर साक्षीदार तसेच तिचे सोबत राहणारे व खेळणारे महीला खेडाळू यांचे सह एकुण २६ साक्षीदार तपासण्यात आले असून त्यांचे बयान नोंदविण्यात आले आहे तसेच सदर प्रकरणात तांत्रिक पुरावे कामी मृतकाचा व आरोपीचा मोबाईल जप्त करून विश्लेषणाकरीता न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, (फॉरेन्सीक)कार्यालय नागपूर येथे पाठविण्यात आले असून न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळे कडुन अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अनुषंगाने पुढील तपास कार्यवाही करण्यात येते. मृतक आणि इतर साक्षीदार यांचे मोबाईल क्रमाकाचे तांत्रिक दृष्टया विश्लेषण करण्यात आले आहे. तसेच या प्रकरणात फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे तसेच या व्यतिरिक्त इतर कोणी जबाबदार आहे किंवा कसे ? याबाबत तपास एमआयडीसी बुटीबोरी पोलीस करीत आहेत.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद ३ आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद**:— दिनांक १३/०९/२०२५ रोजी केळवद पोलीस पोस्टे परीसरात पेट्रोलींग करीत असता गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पांढुर्णा ते नागपुर रोड वरील नांदा फाटा येथे नाकाबंदी केली असता पाढुर्णा कडुन महींद्रा XUV क्र एम.एच—४३/ए.आर.—६००८ येतांना दिसली.वाहन चालकाला वाहन थांबविण्याचा इशारा केला असता वाहन चालक सलाई तांडा मार्गे पळुन गेला केळवद पोलीसांनी शिताफिने पाठलाग करून नमुद वाहनाला तिडंगी शिवार, ग्रिन ग्रास फार्म जवळ थांबविले. वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता वाहनामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. वाहन चालक **आरोपी क्रं १) तुषार संजय नवघरे, वय—२९, वर्ष रा. बुधवारी पेठ, उमरेड जि.नागपुर त्याच्या सह**

**वाहनात असलेले आरोपी क्रं २) अर्पित रमेश मुहीनकर, वय २० वर्षे, रा ढिवर मोहल्ला, उमरेड आणि आरोपी क्रं ३) पंकज चंद्रभान भुरसे, वय २४ वर्षे,रा बुधवारी पेठ, उमरेड असे वाहनात मिळुन आले**. नमुद तिन्ही आरोपीतांना अधिक विचारपुस केली असता त्यांनी पांढुर्णा राज्य मध्य प्रदेश येथील पुरवठादार आरोपी क्रं ४) मोनु तनवानी याचे कडुन प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु आणल्याबाबत सांगितले. पोलीसांनी **पंचासमक्ष सुगंधित तबांखु इगल हुक्का शिशा ब्रॅन्ड ४०० ग्रॅम वजनाचे एकुण १९८ कंपनी पॅकबंद पाकीटे एकुण वनज ७९ किलो २०० ग्रॅम एकुण किंमती १,६८,०००/—रूपये , महींद्रा XUV क्र एम.एच—४३/ए.आर.—६००८ किंमती १०,००,०००/—रूपये आणि तीन मोबाईल १,०५,००० /—रूपये असा एकुण १२,७३,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीतांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा, पुरवठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी क्रं १ ते ४ यांच्या विरूद्ध पोस्टे केळवद येथेभारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३, ३(५) सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**आरोपी क्रं १ ते ३ यांना केळवद पोलीसांनी अटक केली आहे.**

## अंमलीपदार्थ गांजा बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## अंमली पदार्थ कारवाई पथक नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी**:— दिनांक १२/०९/२०२५ रोजी अंमली पदार्थ कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी हद्दीत आरोपी नामे अंकुश संजय कारमारे, वय २३ वर्षे, रा. गंगापुर झोपडपटटी टाकळघाट हा त्याचे राहते घरी गांजाची विक्री करतो. मिळालेल्या महीतीच्या आधारे नमुद पथकाने घटनास्थळी जावुन आरोपीच्या घराची झडती घेतली असता ९१७ ग्रॅम ग्रॅम वाजनाचा हिरवट रंगाचा पान फुले बीया बोंडे असलेल उग्र वासाचा ओलसर गांजा सदृश्य पदार्थ किंमती ९,०००/—रुपयांचा मुद्देमाल मिळुन आला. पोलीसांनी नमुद मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला. आरोपीला पोलीसांची चाहुल लागताच तो पळुन गेला.

आरोपी नामे अंकुश संजय कारमारे, वय २३ वर्षे, रा. गंगापुर झोपडपटटी, टाकळघाट, जि. नागपुर याच्या विरूध्द पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी, येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## डिझेल चा अवैधरित्या साठा करून ठेवणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन सावनेर**:— दिनांक १२/०९/२०२५ रोजी श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांना गुप्तबातमीदार कडुन खात्रीशीर खबर मिळाली की, बोरगाव शिवारातील राहाटे फार्म हाउस येथे काही इसम जिवनावश्यक वस्तु डिझेल ची अवैधरित्या साठा करून स्वत:चे फायद्याकरिता विक्री करित आहे. अशा माहीतवरून श्री सागर खर्डे यांनी सावनेर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार यांचे पथक तयार करून त्यांना कारवाई करण्याचे आदेश दिले. नमुद पथकाने तात्काळ पंचासह जावुन बोरगाव शेतशिवारातील राहाटे फार्म हाउसची झडती घेतली असता तेथे आरोपी क्रमांक **१) तौकीर रजाउल्ला अन्सारी, वय ३० वर्ष, रा. तन्मय बार समोर, वाघोडा सावनेर २) रवि उर्फ रविन्द्र शामराव ठाकरे, वय ३९ वर्ष, रा. वार्ड क्र. ०१, बोरगाव ता. कळमेश्वर हे मिळुन आले.** घटनास्थळाची पाहणी केली असता डबक्यांमध्ये जिवनावश्यक वस्तु डिझेल मिळुन आले. पोलीसांनी दोन्ही आरोपीतांना डिझेलच्या बिलांबाबत तसेच कागदपत्रांबाबत विचारना केली असता त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्रे नव्हती. तसेच सदर घटनास्थळाच्या मालकी हक्काबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, नमुद शेत आरोपी क्रं २ रवि उर्फ रविन्द्र शामराव ठाकरे वय ३९ वर्ष रा. वार्ड क्र. ०१ बोरगाव ता. कळमेश्वर याचे ताब्यात आहे. नमुद आरोपी क्रं १ आणि २ यांनी संगणमत करून अवैध्यरित्या डिझेल ची साठवणुक करून विक्री करीत असल्याचे दिसुन आले. **पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १९ प्लास्टीक कॅनमध्ये अंदाजे ३६० लिटर डिझेल किंमती**

**३२,४०० /— रूपये आणि दोन अॅड्रॉईड मोबाईल किंमती १०,००० रूपये असा एकुण ४२,४०० /— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**नमुद आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन सावनेर येथे २८७, ३(५) भा.न्या.स., सहकलम ३, ७ अत्यावशक वस्तु अधि. १९५५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे**

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील ६४० रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १३/०९/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ६४० आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बोरी येथे ३२ आरोपी , ,पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३३ आरोपी अशा एकुण ९५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २५ आणि पोलीस स्टेशन वेलतुर २८ आरोपी अशा एकुण ११४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३१ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे २० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २७ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १०९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २७ आरोपी अशा एकुण ५९ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे २७ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३१ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २१ आरोपी अशा एकुण ११० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ४२ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३१ आरोपी अशा एकुण १५३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ६४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**






मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने